# पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.
## प्रेसनोट

दरवर्षी प्रमाणे पुणे व पिंपरी-चिंचवड शहरामध्ये दिनांक २५/०८/२०१७ ते दिनांक ०५/०९/२०१७ या कालावधीमध्ये गणेशोत्सव साजरा होत असून गणेशोत्सवातील देखावे पाहण्यासाठी शहरा बाहेरून व शहराअंतर्गत नागरिक मोठ्या प्रमाणावर येत असतात.

पिंपरी-चिंचवड शहरामधुन पुणे शहरांमध्ये गणेशोत्सव देखावे पाहण्यासाठी येणाऱ्या नागरिकांची मोठी संख्या पाहता पुणे महानगर परिवहन महामंडळामार्फत पिंपरी-चिंचवड शहरातील मुख्य बस स्थानकांवरून दरवर्षी प्रमाणे यदांही गर्दीनुसार रात्रभर बससेवा पुरविण्याचे नियोजन करण्यात आलेली आहे. त्या अनुषंगाने खालील ठिकाणांहुन सुटणाऱ्या बसेसचे नियोजन तक्ता खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र | स्थानकाचे नाव | म.न.पा.साठी बस संख्या |
|---|---|---|
| १. | निगडी | ५१ |
| २. | चिंचवडगांव | ५६ |
| ३. | भोसरी | ५८ |
| ४. | पिंपळेगुरव | १० |
| ५. | सांगवी | १० |
| ६. | आकुर्डी रेल्वे स्टेशन | ७ |
| ७. | चिंचवडगांव मार्गे डांगे चौक | ४० |
| **एकुण** | | **२४०** |

उपरोक्तनुसार २४० बसेस या रात्रपाळीकरीता गणशोत्सव कालावधीमध्ये संचलनात ठेवण्याचे नियोजन करण्यात आलेले आहे.

- ❖ दैनंदिन संचलन गणेशोत्सव कालावधीमध्ये रात्री १०.०० नंतर बंद राहणार असून रात्री १०.०० नंतर सर्व बसेस यात्रा स्पेशल म्हणून संचलनात राहणार आहेत.
- ❖ रात्री १०.०० नंतर बससेवेसाठी प्रचलीत दरामध्ये रूपये ५/- जादा दर आकारणी करण्यात येईल.
- ❖ गणेशोत्सव कालावधीत देण्यात येणारी हि रात्री बससेवा खास बससेवा असल्याने सर्व पासधारकांस, रात्री १२.०० वाजेपर्यंत पासाची सवलत ठेवण्यात आलेली आहे. **त्यानंतर कुठल्याही प्रकारचे पास चालणार नाहीत.**
- ❖ पिंपरी-चिंचवड शहराकरीता नव्याने गणशोत्सव मार्ग म्हणुन एक वर्तुळ मार्ग **विशेष सवलत दरात** चालु ठेवण्यात येणार आहे.

❖ **पिंपरी-चिंचवड शहर करीता गणेशोत्सव वर्तुळ मार्ग** :-दिनांक ३१/०८/२०१७ ते ०५/०९/२०१७ या कालवधीत गणेशोत्सव सोहळ्या निमित्त शहराच्या विविध उपनगरांना जोडणारा **वर्तुळ मार्ग भोसरी-नेहरूनगर-पिंपरी-चिंचवड-निगडी-पिंपरी रोड-नेहरूनगर-भोसरी अशा मार्गावर प्रति प्रवासी रूपये १०/- या प्रमाणे** एकाच दराचे तिकीट आकारणी राहणार असून या वर्तुळ मार्गावर २० मि. वारंवारीतेने रात्रपाळीत १८०० ते ०२०० या वेळेमध्ये संचलनात ठेवण्यात येत आहेत.

श्री गणेशोत्सव कालावधीत वर दर्शविलेल्या पिंपरी-चिंचवडमधील तक्त्यामधोल बसस्थानकावरून म.न.पा. पर्यंत रात्रौ गरजेनुसार बससेवा देण्यात येणार आहे. तसेच मुख्य स्थानकांवर प्रवाशांच्या सोईसाठी अधिकारी/कर्मचाऱ्यांची विशेष नियुक्ती करण्यात आलेली आहे.

याची सर्व प्रवाशांनी नोंद घ्यावी. व सहकार्य करावे असे आवाहन पुणे महानगर परिवहन महामंडळाकडून करण्यात येत आहे.

## पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.
## प्रेसनोट

श्री. गणेशोत्सव कालावधीत पुणे शहरात नजिकच्या उपनगरातून व बाहेरगावहून गणपतीची रोषणाई /सजावट पाहण्यासाठी मोठ्या प्रमाणात गर्दी होत असते या कारणास्तव प्रवासी नागरिकांचे सोयीकरिता प्रतिवर्षी प्रमाणे यंदाही पुणे महानगर परिवहन महामंडळाकडून दिनांक २५/०८/२०१७ ते दिनांक ०५/०९/२०१७ या काळात रात्रौ ६४१ बसेसचे गणेशोत्सवा करीता जादा नियोजन करण्यात आलेले आहे.

- ❖ नागरिकांचे वाहतुकीचे सोयीसाठी खाली नमूद केलेल्या स्थानकावर प्रवासी गर्दीनुसार या कालावधीत खास बससेवा उपलब्ध करून देण्यात येणार आहे.
- ❖ दैनंदिन संचलन गणेशोत्सव कालावधीमध्ये रात्रौ १०.०० नंतर बंद राहणार असून रात्रौ १०.०० नंतर सर्व बसेस यात्रा स्पेशल म्हणून संचलनात राहणार आहेत.
- ❖ रात्रौ १०.०० नंतर बससेवेसाठी प्रचलीत दरामध्ये रूपये ५/- जादा दर आकारणी करण्यात येईल.
- ❖ गणेशोत्सव कालावधीत देण्यात येणारी हि रात्रौ बससेवा खास बससेवा असल्याने सर्व पासधारकांस, रात्रौ १२.०० वाजेपर्यंत पासाची सवलत ठेवण्यात आलेली आहे. **त्यानंतर कुठल्याही प्रकारचे पास चालणार नाहीत.**
- ❖ श्री गणेशोत्सव कालावधीत शहरविभागातील रस्ते सायंकाळी पोलिस खात्याकडून बंद ठेवले जातात त्यामुळे शहराच्या आतील भागातील बससेवा पर्यायी मार्गाने चालु ठेवण्यात येईल.
- ❖ पुणे व पिंपरी-चिंचवड शहराकरीता नव्याने गणशोत्सव मार्ग **म्हणुन दोन वर्तुळ मार्ग स्वस्त दरात** चालु ठेवण्यात येणार आहे.

**दिनांक ३१/०८/२०१७ ते दिनांक ०५/०९/२०१७ या कालावधीत करिता बसेस सुटण्याची ठिकाणे.**

| अ.क्र | स्थानकाचे नांव | बसमार्ग /शेवटचे ठिकाण |
|---|---|---|
| १. | स्वारगेट | कात्रज, धनकवडी, भारतीविद्यापिठ , आंबेगांव, अप्पर इं नगर, सुखसागर नगर, मार्केटयार्ड. |
| | | पुणे स्टेशन, सांगवी, आळंदी. |
| | | वडगांव, धायरी व गरजेनुसार सिंहगड, खानापुर. |
| | | हडपसर, कोंढवा . |
| २. | म.न.पा. स्थानक | लोहगांव, वडगांवशेरी, मुंढवागांव/केशवनगर , शुभम सोसा., आनंदपार्क , तळेगांव ढमढेरे, हडपसर |
| | | भोसरी, चिंचवड, निगडी, देवाची आळंदी, देहूगांव, विश्रांतवाडी, विद्यानगर,पाषाण,सुतारवाडी, बालेवाडी, म्हाळुंगेगांव , तळेगांव दाभाडे, सांगवी, पिंपळे गुरव, प्राधिकरण.खडकी बाजार |
| | | कर्वेनगर, माळवाडी, कोंढवागेट , कोथरूड डेपो . |
| | | बालेवाडी, पाषाण , सुतारवाडी, अभिनव. करीता |

| अ.क्र | स्थानकाचे नांव | बसमार्ग /शेवटचे ठिकाण |
|---|---|---|
| ३. | पुणे स्टेशन | विश्रांतवाडी, धानोरी, विद्यानगर, विमाननगर, वडगांव शेरी, आळंदी, |
| ४. | हडपसर गाडीतळ बस स्थानक | स्वारगेट, पुणे स्टेशन, मनपा भवन, सासवड, ऊरूळी कांचन, मांजरी थेऊर, वडकी गांव,फ़रसुंगी, देवाची ऊरूळी. |
| ५. | महात्मा गांधी बस स्थानक | कोंढवा खुर्द, काढवा बुद्रुक , साळुंके विहार. |
| ६. | डेक्कन जिमखाना / संभाजी पूल कॉर्नर | कर्वेनगर, माळवाडी, कोंढवागेट,गोखले नगर, कोथरूड डेपो. |
| ७. | निगडी बस स्थानक | म.न.पा. भवन ,स्वारगेट व कात्रज करीता. |
| ८. | भोसरी बस स्थानक | म.न.पा. भवन करीता. |
| ९. | चिंचवडगांव बस स्थानक | म.न.पा. भवन करीता. |

- **पुणे शहरा करीता गणेशोत्सव वर्तुळ मार्गः**-दिनांक ३१/०८/२०१७ ते ०५/०९/२०१७ या कालवधीत शहराअंतर्गत सर्व वाहनांसाठी वाहतुकीकरीता रस्ते बंद करण्यात येतात. त्यामुळे गणेशोत्सव सोहळ्या निमित्त **विशेष स्वस्त बससेवा म्हणून स्वारगेट-डेक्कन-म.न.पा.-शिवाजीनगर-पुणे स्टेशन- पुलगेट-स्वारगेट या मार्गावर प्रति प्रवासी रूपये १०/- या प्रमाणे** एकाच दराचे तिकीट आकारणी राहणार असून या वर्तुळ मार्गावर १० मि. वारंवारीतेने रात्रपाळीत १८०० ते ०२०० या वेळेमध्ये संचलनात ठेवण्यात येत आहेत.
- **पिंपरी-चिंचवड शहर करीता गणेशोत्सव वर्तुळ मार्ग** :-दिनांक ३१/०८/२०१७ ते ०५/०९/२०१७ या कालवधीत गणेशोत्सव सोहळ्या निमित्त शहराच्या विविध उपनगरांना जोडणारा **वर्तुळ मार्ग भोसरी-नेहरूनगर-पिंपरी-चिंचवड-निगडी-पिंपरी रोड-नेहरूनगर-भोसरी अशा मार्गावर प्रति प्रवासी रूपये १०/- या प्रमाणे** एकाच दराचे तिकीट आकारणी राहणार असून या वर्तुळ मार्गावर २० मि. वारंवारीतेने रात्रपाळीत १८०० ते ०२०० या वेळेमध्ये संचलनात ठेवण्यात येत आहेत.
- दिनांक ३०/०८/२०१७ ते दिनांक ०५/०९/२०१७ पर्यंत प्रवाशांच्या मागणीनुसार स्वारगेट ते निगडी अशी रात्रौ (यात्रेकरिता) जादा बसेस सोडण्यात येतील.

श्री गणेशोत्सव कालावधीत वर दर्शविलेल्या तक्त्यामधील बसस्थानकावरून त्या समोर दर्शविलेल्या ठिकाणांपर्यंत रात्रौ गरजेनुसार बससेवा देण्यात येणार आहे.

गणेशोत्सव कालावधीत गणेश भक्तांच्या सोयीसाठी वरिल प्रमाणे जादा बस संचलन करण्यात येणार असून त्याचप्रमाणे शहरातील मख्य रस्ते बस वाहतुकीसाठी बंद राहणार असून प्रवाशांची गैरसोय होवु नये म्हणून दिवसभराच्या संचलनामध्ये नेहमीच्या शिवाजीरोड, बाजीरावरोड, लक्ष्मीरोड, टिळकरोड या रस्त्यावरून संचलनात असलेल्या बसेसचे मार्गामध्ये आवश्यकते नुसार बदल करण्यात येणार आहे. तथापि तिकीट दर रचना ही नेहमीच्याच मार्गांची आकारणी करण्यात येईल. याची सर्व प्रवाशांनी नोंद घ्यावी. व सहकार्य करावे असे आवाहन पुणे महानगर परिवहन महामंडळाकडून करण्यात येत आहे.